# खात्याची केवायसी म्हणजे कंपनी आणि ग्राहकाची सुरक्षा

## आरबीआय क्षेत्रीय निदेशक सचिन शेंडे यांचे प्रतिपादन



**नमस्कार अमरावती**

**अमरावती (प्रतिनिधी) दि. १९ :** केवायसी प्रक्रिया मनी लॉन्ड्रींग किंवा फसवणूक यासारख्या बेकायदेशीर क्रियाकलापांना रोखण्यासाठी केली जाते, त्या बदल्यात कंपनी आणि ग्राहक दोघांचेही संरक्षण होते, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया नागपूरचे क्षेत्रीय निदेशक सचिन शेंडे यांनी केले. जिल्हा अग्रणी बँक सेंट्रल बँक ऑफ़ इंडिया तर्फे नांदगाव पेठ येथे वित्तीय समावेशन शिबिरात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या शिबिरात क्षेत्रीय निदेशक सचिन शेंडे यांच्यासह उपमहाप्रबंधक अंजना श्यामनाथ यांची प्रमुख उपस्थिति होती. प्रास्ताविक सेंट्रल बँक ऑफ़ इंडियाचे क्षेत्रीय प्रमुख सुनील पाण्डेय यांनी केले. यूनियन बँकेचे क्षेत्रीय प्रमुख प्रमोद परहाते यांनी विचार व्यक्त केले.

खातेदारानी आपल्या खात्याची केवायसी करुन घेणे खूप गरजेचे आहे, असे सांगत शेंडे यांनी प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना, जीवन ज्योति बीमा योजना आणि अटल पेंशन योजनचे महत्व सांगितले. या शिबिरात सेंट्रल बँक इंडियाद्वारे काही कर्जदाराना धनादेशाद्वारे कर्जाचे वाटप करण्यात आले तर यूनियन बँकेद्वारे सुरक्षा बीमा योजनचे धनादेश लाभार्थीयाना देण्यात आले. संचालन नरेश हेड़ाऊ यांनी केले तर निलेश मुंढेकर यांनी आभार मानले.